महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. ०२२-२४०३१४९८ /०२२-२४०९०७७०
Email Id: cpfsection@gmail.com
website:www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मुंबई ४०० ०१९.

क्र.लेवि/भनिनि/ D/53 दिनांक : 4 MAR 2025

# परिपत्रक क्रं. २४३

**विषय :–** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी न्यासाच्या वर्तमानपत्रातील बातमी संदर्भात.
**संदर्भ :–** क्रं. लेवि/भनिनि/D/89 दि. १३ मार्च २०२४

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व इतर कायदा १९५२ नुसार , महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी (भ.नि.नि.) ट्रस्ट हे "ना नफा ना तोटा" हया तत्वावर कार्यान्वित आहे. या कायदया नुसार ट्रस्टने केलेली गुंतवणुक ही श्रम व रोजगार विभाग मंत्रालय, भारत सरकार तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या अधिसुचना दिनांक ०९ जून २०१५ नुसार गुंतवणूक नमुना (Investment Pattern) यामध्ये निर्देशित केलेल्या अटी व शर्ती यांचे तंतोतंत पालन करुन केली जाते. सदर गुंतवणुक ही म.रा.वि.मं भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट चे अध्यक्ष , प्रशासन प्रतिनिधी विश्वस्त व कर्मचारी संघटना प्रतिनिधी विश्वस्त यांची संयुक्त बैठक घेवून विचार विनियम करुनच केली जाते.

कंपन्यांचे वार्षिक ताळेबंद अहवाल व आर.बी.आय रजिस्टर रेटिंग ऐजन्सी यांनी दिलेली रेटिंगची छाननी करुनच गुंतवणुक केली जाते. ट्रस्टने केलेल्या गुंतवणुकीवर मिळणारा निधी हा पुरेसा असुन वीज कर्मचाऱ्याची पीएफची गुतवलेली रक्कम व्याजा सहित वेळेत देण्यात काही अडचण नाही. तसेच आज तारखेपर्यंत चारही कंपनीतील जे कर्मचारी सेवानिवृत्त होतात , मयत होतात त्यांच्या वारसांना तसेच पीएफ रक्कमे मधील आगाऊ उचल यासाठी प्राप्त होणारे अर्ज वेळेत निकाली काढून त्यांच्या देय असलेल्या रक्कमा योग्य त्या व्याजा सहित म.रा.वि.मं.भ.नि.नि. न्यासाने वेळेत अदा केल्या आहेत व करत आहेत. त्याअनुषंगाने वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांमुळे संभ्रमित होऊ नये. गत वर्षी सुद्धा वर्तमान पत्रामध्ये पीएफ च्या गुंतवणुकी बाबत कर्मचाऱ्यांना संभ्रमात टाकणारी बातमी प्रसिध्द झाली होती. त्या अनुषगाने म.रा.वि.मं.भ.नि.नि.न्यास , सचिव यांच्या स्वाक्षरीचे वरील संदर्भिय परिपत्रक प्रसिध्द केले होते. सदर परिपत्रकातील दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

म.रा.वि.मं.भ.नि.नि.न्यासाचा वार्षिक ताळेबंद हा वैधानिक लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या मार्फत प्रत्येक वर्षी तपासला जातो. त्याचबरोबर प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी कार्यालय हे प्रत्येक वर्षी त्यांचे Enforcement Officer ला पाठवून म.रा.वि.मं.भ.नि.नि. न्यासचे ऑडीट करीत असतात. हया तिन्ही ही लेखापरिक्षक संस्थेनी त्यांच्या अहवालात आर्थिक घोटाळा संबंधीत तसेच चुकीची पध्दतीने गुंतवणूक झालेली आहे असा कोठेही उल्लेख केलेला नाही.

म.रा.वि.मं.भ.नि.नि. न्यासास झालेली आर्थिक तुट ही कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व इतर कायदा १९५२ च्या तरतुदीनुसार म.रा.वि. सुत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांच्या एकत्रित पाठींब्याने म.रा.वि.मं.भ.नि.नि.न्यासास वेळोवेळी भरुन दिलेली आहे. म.रा.वि.मंडळ भनिनि ट्रस्ट सक्षम पणे कार्यान्वित असुन **कर्मचाऱ्यांची पीएफ रक्कम हि पुर्णपणे सुरक्षित आहे.**

प्रस्तुत प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.मं.भ.नि.नि.न्यासाच्या संकेतस्थळावर (CPF Portal) उपलब्ध करण्यात आले आहे.

सचिव
तर्फे म.रा.वि.मं.भ.नि.नि न्यास